महाराष्ट्र शासन

क्र.औन्यामुं-०७२४/प्र.क्र.८८/ काम- ६
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑगस्ट, २०२४.

विषय :- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात औद्योगिक व कामगार न्यायालय, नागपूर कार्यालयाचे संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करण्याकरिता अनुदान मंजूर करुन योजनेअंतर्गत योजना २०२४-२५ करिता मंजूर तरतूद बीडीएसवर उपलब्ध करून सदर खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत. **मुख्यलेखाशीर्ष**-२२३० (००) (०७) **औदयोगिक न्यायालये** (कार्यक्रम) २२३० १३१२-१३ "**कार्यालयीन खर्च**".

वाचा :- १. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र.औन्यामुं/आस्था-२/१६९०, दिनांक १९/०७/२०२४

२. सहायक प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, नागपूर, यांचे पत्र.जा.क्र.६२३/ २०२४, दिनांक ०४/०७/२०२४.

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१ नागपूर यांचे पत्र क्र.- जा.क्र. तां-४(२)/ ९४३८/२०२४, दिनांक ०७/०६/२०२४

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३,दिनांक ०१ एप्रिल, २०२४.

ज्ञापन :-

प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रासंदर्भात कळविण्यात येते की, योजनांतर्गत योजना मागणी क्र.के-४, २२३० १३१२- १३ "कार्यालयीन खर्च" या उप लेखाशिर्षाखाली नागपुर येथील औद्योगिक व कामगार न्यायालयातील न्यायदान कक्षात जाण्यासाठी इमारतीमध्ये उद्वहन (Lift) बसविण्याकरीता संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करणे आवश्यक असल्याचे उक्त संदर्भ क्र.१ ते ३ पत्रान्वये मंजूरी मिळण्यास्तव कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने औद्योगिक व कामगार न्यायालय, नागपूर येथील इमारतींचे (Structural Audit) "विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी" नागपूर (VNIT) यांचेकडून करण्यासाठी येणाऱ्या एकूण अंदाजित खर्च रुपये ४,७२,०००/- (रूपये चार लाख बाहत्तर फक्त) एवढया खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. सदर खर्च (२२३० १३१२) १३ "कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली टाकून तो चालू वर्षी सन २०२४-२५ करीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४०८१३१२२९३२२७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DEEPALI UPENDRA JAPE

Digitally signed by DEEPALI UPENDRA JAPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=735d6d81d9099a643dc5a1e7e261a6ea60ad4418817bd25d02db4654ea8c8e11,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F1EDA6DD54D9C1D002A33252AA96B6C559E22C914431F772457B39E98A5FCEAC, cn=DEEPALI UPENDRA JAPE
Date: 2024.08.13 12:45:34 +05'30'

(दीपाली जपे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र मुंबई.
२. महालेखापाल - १, (लेखापरीक्षा / लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
३. लेखा व कोषागार अधिकारी, नागपूर.
४. निवड नस्ती (कामगार-६).